# निशाणी क्र.६२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार मनोहर सावंत यांनी मयत अपीलकार अरूण गंगाराम सावंत यांचे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करणेतस झालेला विंलब क्षमापित करणेत आलेला आहे तसेच अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करणेत आलेला आहे. त्यामुळे मयत अपीलकार यांचे वारसांना अभिलेखावर घेणेस परवानगी देणे न्यायोचित वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## — आदेश —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत अपीलकार अरूण गंगाराम सावंत यांचे वारस पटलावर घेणेस परवानगी देण्यात येते.

३. अपीलकार यांनी आवश्यक ती दुरूस्ती अपील मेमोत विहित मुदतीत करावी.

(आर.बी.रोटे)
दि.०७/०४/२०२२
जिल्हा न्यायाधीश—१
सिंधुदुर्ग —ओरोस